
# नि:संतान दांपत्यांसाठी
# एक वरदान!



वरदानाने संतान प्राप्ती झालेल्या अनेक कथा आपण प्राचिन साहित्यातून वाचतो. अमूक एका राजाने अथवा राणीने पुत्र प्राप्तीसाठी तप केले अथवा यज्ञ केला व त्यामुळे प्रसन्न होऊन एखाद्या देवाने प्रसाद अथवा फळ दिले व ते खाल्ल्यानंतर राणीला मातृत्वाचे सुख मिळाले, अथवा केवळ वरदानाने संतान प्राप्ती झाली अशा अनेक पौराणिक कथा आपण ऐकतो.

आजच्या या अत्याधुनिक विज्ञानयुगात असेच एक वरदान नि:संतान दांपत्यांसाठी उपलब्ध झाले आहे. ते म्हणजे 'टेस्टट्युब बेबी' यालाच शास्त्रीय भाषेत In Vitro Fertilisation (IVF) म्हटले जाते या IVF तंत्राचा वापर १९७८ पासून यशस्वीपणे केला जात आहे. अजूनही आपल्या देशात 'टेस्टट्युब बेबी' हे नाव खूपच रहस्यमय समजले जाते. या रहस्यमयी वरदानाची शास्त्रीय माहिती संक्षिप्तपणे आपणास देत आहोत.




## काय आहे टेस्टट्यूब बेबी?

नैसर्गिकरीत्या जेव्हा स्त्रीच्या गर्भनलिकेत स्त्रीबीज व शुक्राणू यांचे मिलन होते व फलित बीजांड स्त्रीच्या गर्भाशयात विकसित होऊ लागते व ९ महिन्यानंतर हा गर्भ एका बाळाच्या रूपात जन्म घेतो ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. टेस्टट्युब बेबी म्हणजे IVF ही एक अशी प्रक्रिया आहे, ज्यामध्ये स्त्रीबीज व पुरूष बीज (शुक्राणू) यांचे मिलन डॉक्टरांच्या देखरेखीखाली लॅबोरेटरीत योग्य वातावरणातील द्रवात घडविले जाते



व अशात-हेने फलित झालेले स्त्रीबीज भ्रूणाच्या रूपात २ ते ५ दिवस लॅबोरेटरीत विकसित केले जाते व हा विकसित भ्रूण स्त्रीच्या गर्भाशयात प्रत्योरोपित केला जातो. अशारीतीने लॅबोरेटरीत तयार केलेला भ्रूण पुढे ९ महिने स्त्रीच्या गर्भाशयात वाढतो व त्या मातेस मातृत्वसुखाचे वरदान प्राप्त होते. या प्रक्रियेस IVF किंवा टेस्टट्यूब बेबी म्हटले जाते.

## या टेस्टट्यूब बेबी प्रक्रियेत प्रामुख्याने ५ स्टेप्स केल्या जातात.

### १ सुपर ओव्हुलेशन (पहिली स्टेप)

या प्रक्रियेत स्त्रियांना हार्मोनल इंजेक्शन दिले जाते. जेणेकरून स्त्रीच्या बीजांडकोशात एकाहून अधिक स्त्रीबीजे विकसित होतात. नैसर्गिकरीत्या स्त्रियांच्या बीजांडकोशात महिन्याभरात एकच स्त्रीबीज तयार होते. या प्रक्रियेदरम्यान स्त्रीची ट्रान्सव्हजायनल सोनोग्राफी केली जाते. त्यामुळे बीजांडकोशात वाढणाऱ्या स्त्रीबीजांवर लक्ष ठेवुन हार्मोनल पातळीवरही नियत्रंण ठेवता येते.

### २ दुसरी स्टेप - विकसित स्त्रीबीज बाहेर काढणे (एग रिमूवल)

स्त्री बीजाची योग्य वाढ झाल्यानंतर सोनोग्राफीच्या मदतीने तज्ञ डॉक्टर स्त्रीच्या अंडकोषात एक सुई घालून स्त्रीबीजे अलगदपणे बाहेर काढतात. काही केसेसमध्ये लॅप्रोस्कोपिक तंत्राने स्त्री बीज बाहेर काढले जाते. या प्रक्रियेसाठी फार वेळ लागत नाही व स्त्रीला थोडावेळच भूल दिली जाते.

जर स्त्रीच्या बीजांडकोशात स्त्रीबीज विकसित होत नसतील तर डोनर स्त्री बीजाचा वापर केला जातो.

### ३ तिसरी स्टेप- स्त्रीबीज फलीकरण (Fertilisation)

ही प्रक्रिया भ्रूणतज्ज्ञ (Embryologist) डॉक्टर सुक्ष्मदर्शक यंत्राखाली करतात यामध्ये परिपक्व स्त्रीबीजामध्ये डॉक्टर स्वत:च सुईच्या सहाय्याने निवडलेल्या उत्तम शुक्राणूस रौपीत करतात. या प्रक्रियेला इंट्रासायटोप्लाजमिक स्पर्म इंजेक्शन (ICSI) म्हणतात. या पद्धतीने स्त्रीबीजाचे फलिकरण घडविले जाते.

### ४ चौथी स्टेप-भ्रूणविकास

फलित झालेले स्त्रीबीज योग्य त्या मेडियामध्ये व योग्य त्या वातावरणामध्ये वाढविले जाते. विभाजित होऊ लागते तेव्हा त्याला भ्रूण म्हणतात. डॉक्टर त्याचं योग्य पध्दतीने निरीक्षण करतात व भ्रूण योग्य तऱ्हेने विकसित होत आहे की नाही पाहतात व भ्रूणाची योग्य ती वाढ झालेली दिसताच पुढील स्टेप केली जाते.

### ५ पाचवी स्टेप -भ्रूण-प्रत्यारोपण

स्त्रीबीजाचे फलिकरण झाल्यानंतर २ ते ५ दिवसांनी योग्य ते विकसित भ्रूण स्त्रीच्या गर्भाशयात प्रत्यारोपित केले जाते. हे प्रत्यारोपण करण्यासाठी डॉक्टर एका

बारीकशा ट्युब व्दारे भ्रूणाला स्त्रीच्या गर्भाशयात पोहोचवतात. एका वेळेस एकाहून अधिक भ्रूण प्रत्यारापित केले जातात. ही प्रक्रिया वेदनारहित असून यावेळी स्त्रीला भूल देण्याची आवश्यकता नसते.

अशा तऱ्हेने वर दिलेल्या ५ स्टेप्सनुसार टेस्टट्युब बेबी प्रक्रिया पूर्ण होते व स्त्रीच्या गर्भाशयात ही टेस्ट स्ट्युब बेबी वाढू लागते व ९ महिन्यात गर्भाची पूर्ण वाढ होऊन प्रसूतीपश्चात त्या मातेस मातृत्वसुखाचे वरदान पूर्णत्वाने प्राप्त होते.



020-67087900
Mo. 09028062676 / 09028062677
www.indiraivf.com
pune@indiraivf.com

# IVF कधी करावे?

१ नवदांपत्यानी लग्नानंतर अथवा गर्भधारणेसाठी प्रयत्न सुरू केल्यानंतर एक वर्षापर्यंत प्रयत्नपूर्वक नैसर्गिक गर्भधारणेसाठी थांबावे. एक वर्षाच्या प्रयत्नानंतरही गर्भधारणा न झाल्यास तज्ज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार धातुची तपासणी सोनोग्राफी, निर्धारित वेळेवर समागम अथवा IUI (Intra Uterine Insemination) इ. उपचार व प्राथमिक तपासण्या कराव्यात. वरील सर्व प्रयत्न करूनही दोन वर्षात गर्भाधारणा न राहिल्यास दांपत्याने IVF म्हणजेच टेस्टस्टुब बेबी तज्ज्ञांच्या सल्ल्याने उपचार घ्यावेत.

**२. वंध्यत्वाच्या खालील कारणांमध्ये IVF उपचारपध्दती उपयोगी ठरते.**

a) गर्भनलिकांमध्ये अडथळा अथवा गर्भनलिकांचे आजार

b) मासिकपाळीतील अनियमितता व बीजांड कोशामध्ये स्त्रीबीज तयार न होणे.

c) स्त्रीबीज तयार न होणे, व फलित न होणे (PCOD)

d) वयोमानाप्रमाणे रजोनिवृत्ती झालेली असल्यास अथवा तरूण वयातही रजोनिवृत्ती झाली असल्यास. (After Menopause)

e) वीर्यामध्ये शुक्राणूंचे प्रमाण कमी असणे अथवा शुक्राणूंचा अभाव असणे.

f) Endometriosis, Adenomyosis यासारखे गर्भाशयाचे आजार.


g) वीर्यामध्ये शुक्राणू नसणे पण अंडकोषात शुक्राणू असणे (Obstructive Azooseprmia)


h) पुरुषाची अथवा स्त्रीची नसबंदी शस्त्रक्रिया झालेली असल्यास.


i) २-३ वेळा IUI करूनही गर्भधारणा न राहिल्यास


## सर्विसेस



I.U.I (Intra Uterine Insemination)


I.V.F. (In Vitro Fertilization)



I.C.S.I. (Intra Cytoplasmic Sperm Injection)


Biastocyst Culture and Transfer


Closed Working Chamber


Laser Assisted Hatching


Laparoscopy & Hysteroscopy


Pre Genetic Diagnosis & Screening


Embryo Freezing Cryopresservation



GOOD NEWS IS Here!

020-67087900
Mo. 09028062676 / 09028062677
www.indiraivf.com
pune@indiraivf.com

# शास्त्रीय पद्धतिनेच उपचार करा

मातृत्वाच्या सुखापासून वंचित स्त्रीचे दु:ख शब्दाव्दारे व्यक्त करणं कठीण आहे. हे असे दु:ख आहे जे समाजातील सर्व स्तरांवरील लोकांना भोगावं लागतं. गावातील लोक देवी देवतांचा धावा करतात, मांत्रिकाकडे जाऊन जादुटोणा करतात व तांत्रिकांच्या जाळ्यात अडकून फसतात. जेवढ्या लवकर दाम्पती योग्य शास्त्रीय पध्दतीने उपचार घेतील तेवढा त्यांना फायदा होण्याची शक्यता जास्त राहते.

पुण्यातील विमाननगर भागातील इंदिरा इनफरटिलीटी क्लिनीक व संशोधन केंद्राने मागील एक वर्षात महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी क्षेत्रात अनेक मोफत शिबिरांचे आयोजन करून सामान्य जनतेपर्यंत टेस्ट ट्युब बेबी प्रक्रियेची वैज्ञानिक माहिती व मोफत सल्ला देण्याचे कार्य केले आहे.

बरेच दाम्पती अधंश्रध्देत बराच वेळ व पैसा वाया घालवतात

डॉ. अमोल लुंकड व त्यांची पत्नी डॉ. इशिता लुंकड यांनी असंख्य नि:संतान दांपत्यांच्या जीवनात आशेचा किरण जागवला आहे. आणि या क्षेत्रात ते सतत कार्यशील आहेत.



**Dr Ishita Lunkad.**
M.D. (OBGY) (AIIMS),
Consultant Gynaecologist
IVF Specialist



**Dr. Amol Lunkad**
M.D. (OBGY) (AIIMS), DNB,
MICOG, GGE, (Germany)
Chief IVF Specialist

# Indira IVF

••• Supporting Your Family Building Dreams



2nd floor Anand Emerald, Sakorenagar,
New Airport Rd., Nr. Symbiosis College
Vimannagar, Pune - 411 014

020-67087900
Mo. 09028062676 / 09028062677

www.indiraivf.com

pune@indiraivf.com